# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 06/08/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापरखेडा – दिनांक 03/08/2020 चे 14.00 वा. ते 15.00 वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्यीत फिर्यादी यांची 13 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि पार्लर मध्ये जात आहे असे सांगुन घरून निघुन गेली. ती परत न आल्याने तिचा शोध घेतला फिर्यादी यांच्या मुलीला आरोपी नामे– ऋतीक, वय अंदाजे 22 वर्ष, रा. खापरखेडा याने फुस लावून पळवून नेल्याचे संशयावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री शेवाळे 96668965648 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील महाजन पेट्रोल पंप समोर खापरखेडा येथे दि. 02/08/2020 चे 20:30 वा. दरम्यान मृतक नामे– अविनाश अबांदास कापसे, वय 38 वर्ष, रा. खापरखेडा हा त्याच्या मित्राच्या घरी वाढदीवसाचे कार्याक्रमाकरीता गेला होता. तसेच तेथुन तो आपले घरी परत पायदळ येत असता दहेगाव वरून खापराखेडा कडे जाणाऱ्या अज्ञात कार चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अविनाश कापसे यास धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी कुणाल हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता दि. 05/08/2020 चे 08.30 वा. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ जवाहर चव्हाण पो. स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंधारे 9823150134 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर